# वाशीतील नागरिकांना सुरक्षेचे धडे

**नवी मुंबई** । प्रतिनिधी

वाशी पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक रावसाहेब सरदेसाई यांनी आज वाशी परिसरातील नागरिकांना सुरक्षेचे धडे दिले. शहरातील वाढत्या गुन्हेगारीबाबत नागरिकांमध्ये जनजागृती करण्यासाठी वाशी येथील राष्ट्रवादी काँग्रेसचे नगरसेवक वैभव गायकवाड यांनी आज 'मेहफूज नवी मुंबई' या एका विशेष कार्यक्रमाचे आयोजन केले होते. वाशी सेक्टर-२ येथील कम्युनिटी सेंटरमध्ये हा कार्यक्रम पार पडला. प्रभागातील २०० हून अधिक नागरिक यावेळी उपस्थित होते. यावेळी नगरसेवक गायकवाड यांनी सोसायट्यांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याची सूचना करीत याची गरज पटवून दिली.

या कार्यक्रमास नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. जवळपास ५८ सोसायट्यांचे पदाधिकारी तसेच २०० नागरिक यावेळी उपस्थित होते. नागरिक आणि पोलिस यांच्या संवादापासून या

## नगरसेवक वैभव गायकवाड यांच्या तर्फे 'मेहफूज' उपक्रम

कार्यक्रमाला सुरुवात झाली. यावेळी नागरिकांनी विचारलेल्या प्रश्नांची पोलिसांनी समाधानकारक उत्तरे दिली. गेल्या काही दिवसांमध्ये नवी मुंबई परीसरात घरफोड्या-चोऱ्या, चैन स्नॅचिंग आदी गुन्ह्यात प्रचंड वाढ झाली आहे. मागील आठवड्यात वाशी परिसरात चोरट्यांनी भरदिवसा घरफोडी करुन सुमारे ६० लाखांचा ऐवज चोरुन नेला आहे. अशा प्रकारच्या गुन्ह्यांत दिवसेंदिवस वाढ होत असल्याने नागरीकांमध्ये या गुन्ह्यांविषयी जनजागृती करण्याच्या उद्देशाने तसेच या गुन्ह्यांना आळा घालण्याच्या दृष्टीने कोणत्या उपाययोजना करणे आवश्यक आहे. यावर विचारविनिमय करण्यासाठी नगरसेवक गायकवाड यांनी वाशी पोलिसांच्या सहकार्याने 'मेहफूज नवी मुंबई' या नावाने कार्यक्रमाचे आयोजन केले होते.



**'मेहफूज नवी मुंबई' कार्यक्रमात बोलताना नगरसेवक वैभव गायकवाड.**

गृहनिर्माण सोसायट्यांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविल्यास चोरी सारख्या वाढत्या घटनांवर आळा बसू शकतो तसेच एखादा गुन्हा घडल्यास त्याची उकलही लवकर होऊ शकते. याकरीता गृहनिर्माण सोसायट्यांना झायकॉम कंपनीच्या माध्यमातून अत्यल्प दारात सीसीटीव्ही कॅमेरे बसवून दिले जाणार आहेत. यासाठी अनेक सोसायट्यांनी सकारात्मक प्रतिसाद दर्शविला असल्याचे नगरसेवक गायकवाड यांनी सांगितले.

वरिष्ठ पोलिस निरीक्षक रावसाहेब सरदेसाई यांनी नागरिकांना खबरदारीच्या छोट्या परंतू महत्वपूर्ण बाबींविषयी मार्गदर्शन केले. महिलांनी रस्त्याने पायी जात असताना आपली बॅग कोणत्या खांद्यावर अडकवावी, एखादा गुन्हा घडल्यास मदत कशा प्रकारे मागावी आदी सल्ले दिले.